महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ९१ वा | दिनांक : ०५/०१/२०२५ | वार : रविवार

# देवेंद्र फडणवीस चुकीच्या लोकांनी वेढलेले : संजय राऊत



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अडीच वर्षे चुकीच्या लोकांनी वेढलेले आहेत. त्याचा परिणाम महाराष्ट्राला भोगावा लागत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. मात्र, ते दैनिक सामना वाचत आहेत, ही चांगली बाब असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या दैनिक सामनामध्ये देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करण्यात आल्यानंतर फडणवीस यांनी देखील शिवसेनेचे आभार मानले होते. यावर संजय राऊत यांना प्रश्न विचारण्यात आला होता, यावेळी ते बोलत होते.

सामना वाचने ही एक सुंदर सवय आहे. जे सामना वाचतात त्यांचे भविष्य उज्वल असते. सामना हा सगळ्यांचा आहे. मग ते सत्ताधारी पक्षाचे असतील किंवा विरोधी पक्षाचे असतील. दैनिक मराठा नंतर दैनिक सामना सत्य - असत्य स्पष्टपणे मांडत आला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्री म्हणून गडचिरोली मध्ये उत्तम काम केले. त्यामुळे आम्ही त्यांचे कौतुक केले. तर बीड प्रकरणात आम्ही त्यांच्यावर टीका केली. त्यानंतर या प्रकरणात तपासाने गती घेतली असल्याचा दावा राऊत यांनी केला आहे. कोणी चांगले काम केले असेल तर त्याचे कौतुक करायला हवे, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.

सुरेश धस जे बोलत आहेत ते फडणवीस यांच्या आदेशानेच बोलत असणार, असे देखील संतय राऊत यांनी म्हटले आहे. फडणवीसांच्या आदेशाशिवाय ते शक्य नसलयचा दावा राऊत यांनी केला आहे. कदाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देखील बीडमधील दहशतवाद संपवायचा असल्याचे दिसते, असा विश्वास देखील राऊत यांनी व्यक्त केला.

पोलिस आणि सीआयडीवर जनतेचा आणि विरोधी पक्षांचा दबाव आहे. त्यामुळे सध्या पोलिस करत असलेला तपास योग्य दिशेने सुरू असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस यांना देखील बीड मधील दहशतवाद येथील बंदुकीचे राज्य मोडून काढायचे आहे, असे दिसत असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. त्यामुळे या प्रकरणात पोलिसांवर आपण विश्वास ठेवायला हवा, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे. त्यामुळे या तपासात बाधा येईल, असे सध्या काहीही बोलणार नसल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

भारतीय जनता पक्ष यापुढे एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासोबत निवडणुका लढणार नाही. महापालिका तर सोडूनच द्या, विधानसभेत देखील भाजप स्वबळावर लढेल, असा दावा संजय राऊत यांनी केला आहे. बिहारमध्ये नितेश कुमार यांचा पक्ष एनडीएमध्ये असून देखील त्यांच्याच पक्षाचे खासदार फोडण्याचे काम भारतीय जनता पक्ष करत असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला आहे. मित्र पक्षाच्या पाठीत वार करण्याची भाजपची जुनी सवय आहे. बिहारमध्ये देखील ते समोर आले असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

## खोटारडा पंतप्रधान आमच्यावर बसवण्यापेक्षा तुम्हीच ती गादी का घेत नाही? बी. जी. कोळसे पाटील



**पुणे :** खोटारडा पंतप्रधान आमच्यावर बसवण्यापेक्षा तुम्हीच पंतप्रधान का होत नाहीत? असे विधान माजी. न्यायमूर्ती बी. जी. कोळसे-पाटील यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना उद्देशून केले आहे. पुण्यातील एका कार्यक्रमाला नितीन गडकरी यांनी हजेरी लावली होती. नितीन गडकरी मंचावर येताच कोळसे पाटील यांनी पंतप्रधान पदाबाबत प्रश्न उपस्थित केला. यानंतर उपस्थितांनी टाळ्या आणि शिट्ट्या वाजवून आपला उत्साह दाखवून दिला.

मराठा सेवा संघाचे अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा पार पडत आहे. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात हा सोहळा संपन्न होत असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली. या सोहळ्यात बोलताना बी. जी. कोळसे पाटील यांनी नितीन गडकरींसमोर पंतप्रधान पदाबाबत उपरोक्त मोठे विधान केले.

असला खोटारडा पंतप्रधान आमच्यावर बसवण्यापेक्षा तुम्हीच ती गादी का घेत नाहीत? असा प्रश्न कोळसे पाटील यांनी गडकरींना विचारला. यानंतर कोळसे-पाटील यांनी या वक्तव्याचे कारण देखील नितीन गडकरी यांना सांगितले. तुम्ही तुमच्या बोलण्यातून सर्वसमावेशक दिसता, आणि तुम्ही जर इतिहास पाहिला, तर एकही ब्राम्हण सर्वसमावेशक नेता झालेला नाही. तुम्हाला संधी आहे. तुम्ही पंतप्रधान होऊ शकता,असे कोळसे पाटील म्हणाले. तुम्हाला मी सुयश चिंतीतो, आमची तुम्हाला विनंती आहे, जी. देशाला पाहिजी., आमचा नाईलाज आहे, तुम्ही आम्ही वैचारीक विरुद्ध असलो, तरी आमचा नाईलाज आहे. तुम्ही त्यातल्या त्यात आम्हाला न्याय द्याल असे आम्हाला वाटते, अशी आशा देखील त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

माजी. न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील यांनी यावेळी मराठा आरक्षणवार देखील भाष्य केले. मराठ्यांना आरक्षण हे केंद्राकडून दिले गेले पाहिजे. आज महाराष्ट्रातील ४८ खासदार आहेत, जवळजवळ सर्व बहुजन समाजाचे आहेत, त्या सर्वांनी पंतप्रधान मोदींना सांगितले की, तुम्ही मराठ्यांना आरक्षण द्या, नाहीतर आम्ही सर्वजण तुमचा पाठिंबा काढून घेत आहोत. तर मग एका मिनिटात आरक्षण देतील, असेही ते म्हणाले.

# महावीर रुग्णालयात केली ८१ वर्षांच्या ज्येष्ठाची शस्त्रक्रिया

**छत्रपती संभाजीनगर :** पोटाची अति जोखीमची शस्त्रक्रिया महावीर रुग्णालयात यशस्वीरीत्या पार पडली. शल्यचिकित्सक डॉ. एन. डी. कुलकर्णी यांच्या हस्ते १० वर्षांपूर्वी सिग्मॉइड कोलेक्टोमीची शस्त्रक्रिया झाली होती.

त्यांच्या ओटीपोटात तीव्र वेदना सुरू झाली. माहिती कळल्यावर डॉ. अनंत कुलकर्णी यांनी रुग्णवाहिका तातडीने त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी मार्गदर्शन केले. सर्व जोखमींसह त्वरित शस्त्रक्रिया करण्यास मार्गदर्शन केले. त्यांना ३ मुले, मुलगी आहे.

डॉक्टरावर विश्वास असल्याने मुलांनी शस्त्रक्रियेस सहमती दर्शवली.डॉ. प्रसाद देशपांडे यांच्या नेतृत्वाखालील भूलतज्ज्ञांच्या चमूसहडॉ. रणजित काकडे, डॉ. एन. डी. कुलकर्णी यांच्यासह शल्यचिकित्सकांच्या चमूसह अत्यंत जोखमीची शस्त्रक्रिया इलिओस्टोमी डायव्हर्जन केली.

रुग्णाचे वय आणि इतर आजारांमुळे ही शस्त्रक्रिया जोखमीची होती. परंतु डॉक्टरांच्या प्रयत्नामुळे यशस्वीरीत्या पार पडली. ॲनेस्थेशिया पथकाचे नेतृत्व डॉ. किसान बनसोडे करत होते.

३ तासांच्या शस्त्रक्रियेसाठी डॉ. कैलाश इटके यांच्या नेतृत्वाखालील भूल आणि एफएफपीच्या ६ युनिटसह २ युनिट रक्त आवश्यक होते. महावीर रुग्णालयातील इंटेन्सिव्हिस्ट डॉ. मयूरी पोरे यांनी रुग्णांची दोन दिवस पूर्ण काळजी घेतली. रुग्णालय आणि स्टाफच्या सहकाऱ्यामुळे रुग्ण बरा झाल्याने नातेवाईकांनी आभार मानले

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ जानेवारी २०२५


## गोपीनाथरावांचा वारसा सांगणाऱ्यांची कार्यपद्धती अशोभनीय - गजानन कीर्तिकर



**मुंबई :** बीडच्या मस्साजोग येथील सरपंच संतोष यांच्या हत्या प्रकरणी भाजप आमदार सुरेश धस राष्ट्रवादीचे आमदार धनंजय मुंडे यांच्यावर टीका करण्याची एकही संधी सोडताना दिसत नाहीत. त्यांच्याकडून अनेक दावे, आरोप करताना पाहायला मिळत आहेत. त्यातच आता शिंदे गटाचे माजी खासदार गजानन कीर्तिकर यांनीही धनंजय मुंडे यांच्यासह पंकजा मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

गोपीनाथरावांचा वारसा सांगणाऱ्यांची कार्यपद्धती शोभणारी नाही. तसेच बीडच्या भागातील जनतेचा विश्वास या दोन्ही बहीण-भावावरून उडालेला आहे. अशी टीका कीर्तिकर यांनी केली.

संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात आरोपींपैकी फरार असलेल्या सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे २५ दिवसांनी पुण्यातून अटक करण्यात आली. सीआयडी पथक आणि एसआयटीद्वारे करण्यात येत असलेल्या संयुक्त तपासाद्वारे दोघांनाही बेड्या ठोकण्यात आल्या. मात्र अजूनही एक आरोपी फरार असल्याची माहिती आहे.

यानंतर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया येत असून गजानन कीर्तिकर यांनी एका 'वृत्तवाहिनी'शी बोलताना उपरोक्त मागणी केली आहे. बीड प्रकरणी भाजप आमदार सुरेश धस आणि शिंदे गटाचे माजी खासदार गजानन कीर्तिकर यांनी मुंडे बहीण-भावावर केलेल्या टीकेवरून महायुतीत असलेला बेबनाव पुन्हा एकदा समोर आल्याचे पाहायला मिळत आहे.

गेल्या १५ वर्षांपासून शिवसेना संघटना बांधण्याचे काम मराठवाड्यात करत होतो. सर्व जिल्ह्यातील जवळपास साडे सहाशे गावांत माझा संचार झाला. तिथे असलेले जनजीवन जवळून पाहिले. तेथील परिस्थिती जवळून पाहिली. आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. सरपंच संतोष देशमुख याची हत्या ही भयभीत करणारी परिस्थिती आहे, असे गजानन कीर्तिकर म्हणाले.

१९९५ मध्ये भाजपा नेते दिवगंत गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली गृहराज्यमंत्री म्हणून काम केले. त्यांची काम करण्याची पद्धत आणि वैचारिक बैठक मजबूत होती. ते गृहमंत्री होते, मनात आणले असते, तर दहा वाल्मीक कराड उभे करू शकले असते. मात्र, तशी त्यांची विचारधारा नव्हती. परंतु, आता मोठा वैचारिक बदल या ठिकाणी पाहायला मिळत आहे. वाल्मीक कराड हा गुंड धनंजय मुंडे यांना पोसण्याची गरज काय? असा सवाल गजानन कीर्तिकर यांनी केला. असे वाल्मीक कराड हा धनंजय मुंडे यांचा खास माणूस आहे. गुंड पोसून राजकारणात मोठे होता येते, पण ते फार काळ टिकत नाही, अशी टीकाही गजानन कीर्तिकर यांनी केली.

गोपीनाथ मुंडे यांचा वारसा सांगणाऱ्या धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांची कार्यपद्धती शोभणारी नाही, असे कीर्तिकर म्हणाले. त्या भागातील जनतेचा विश्वास या दोन्ही बहीण-भावावरून उडालेला आहे. त्यांच्याबद्दल रोष निर्माण झाल्याचेही ते म्हणाले. नैतिकता म्हणून धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांनी राजीनामा द्यावा. तरच त्यांना यापुढे राजकीय वाटचाल करताना अडचण येणार नाही, असा सल्ला गजानन कीर्तिकर यांनी दिला. त्या भागात जनता एकसंघ होती, दादागिरीचा लवलेश नव्हता, तो मराठवाडा गेला कुठे? अशी विचारणा गजानन कीर्तिकर यांनी केली.

बीडमधील जनतेचा विश्वास उडाला आहे. बीडच्या जनतेचा रोष निर्माण झाला आहे. त्यामुळे मुंडे बंधू-भगिनींनी त्यागपत्र द्यावे, अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे गजानन कीर्तिकर म्हणाले. धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांना हे शोभदायक नाही. गोपीनाथ मुंडे यांनी पेरलेला विचाराला या गोष्टी मारक आहे. या राज्यात नेमके चाललेय काय, दयनीय परिस्थिती महाराष्ट्रात सुरू आहे, असा हल्लाबोल गजानन कीर्तिकर यांनी केला.

## "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अनंत महिलांची माता" : डॉ बाळासाहेब लिहिणार




**छत्रपती संभाजीनगर (करमाड) :** राजीव गांधी कला, बाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाळासाहेब लिहिणार यांचे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्य आणि कर्तुत्वावर प्रकाश टाकत असताना सावित्रीबाई फुले यांचा अनंत महिलांच्या माता म्हणून उल्लेख केला. भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्त्री ही क्षुद्र अती क्षुद्रापेक्षा हीन समजल्या जात होती, फुले दांपत्याने स्त्रीला शिक्षणाची दारे खुली करून देऊन महिलांना सन्मानाने जगता यावे असे आत्मभान निर्माण करून दिले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंनी महिलांसाठी शाळा सुरू केल्यामुळे महिला आपल्या देशाच्या पंतप्रधान आणि राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचल्या असे भाष्य केले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रा. डॉ. अश्विनीकुमार चिंचोलीकर, प्रा. डॉ. लक्ष्मण दांडगे, प्रा. डॉ. नरेश डहाळे, प्रा. डॉ. कालिदास फड, प्रा. डॉ. जयश्री पाटील, प्रा. डॉ. सुखदेव पोटदुखे, प्रा. डॉ. नानासाहेब लावंड, प्रा. हरिदास होळकर प्रा. प्रशांत माठे, प्रा. लक्ष्मण खरात, प्रा. अर्जुन चव्हाण, प्रा. ज्ञानेश्वर लांडगे, प्रा. गणेश कुराडे, रोहिणी जोशी, श्री भगवंत देशपांडे, श्री मुक्तापूरे, श्री अविनाश साळवे, श्री कैलास जाधव, सुनिता पारेकर, श्री रमेश जाधव, अलका कुलकर्णी, श्री ज्ञानेश्वर जाधव श्री. मधुकर राठोड आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
■ प्रोजेक्ट रिपोर्ट ■ डेझर्टेशन
■ पीएच.डी./एम.फिल.थेसिस ■ कलर प्रिंट
■ डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट ■ स्कॅनिंग
■ स्पायरल व हार्ड बायडींग ■ लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ जानेवारी २०२५


## शिवाजी महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमा अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन



**कन्नड(अरुण थोरात):** शिवाजी महाविद्यालय कन्नड येथे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' पंधरवाडा अभियानाचा प्रारंभ सामूहिक वाचन व भव्य ग्रंथ प्रदर्शनाने करण्यात आला. सामुहिक वाचन उपक्रमात कला,वाणिज्य,विज्ञान, बी.सी. ए.,बि. सी.एस.शाखेच्या १००० विद्यार्थ्यांनी सामूहिक वाचन केले. याप्रसंगी सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ.विजय भोसले यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून वंदन करण्यात आले. यावेळी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाचनाची गोडी निर्माण व्हावी या करिता विद्यार्थ्यांनी अभ्यासाव्यतिरिक्त अवांतर वाचन साहित्य वाचावे असे आव्हान केले. उपक्रमात या पंधरवड्यात दररोज आयोजित होणाऱ्या विविध कार्यक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली व सर्व विद्यार्थ्यांनी प्रत्येक कार्यक्रमात सहभाग नोंदवावा. असे आवाहन केले यासाठी प्रथम द्वितीय तृतीय उत्तेजनार्थ दोन असे पारितोषिक व प्रमाणपत्र दिले जाणार आहे. सामूहिक वाचनासाठी सहभागी विद्यार्थ्यांना विविध प्रकारची पुस्तके ग्रंथालयातून उपलब्ध करून देण्यात आली. पुस्तक वाचल्यानंतर पुस्तकाचा सारांश विद्यार्थी ५०० शब्दात लिहून सादर करणार आहेत.सामूहिक वाचनानंतर ग्रंथातील दुर्मिळ व प्रसिद्ध पुस्तकांचे भव्य ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसिद्ध कवयित्री साहित्यिक डॉ. प्रतिभा अहिरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. प्रतिभा अहिरे यांनी विविध ग्रंथाविषयी माहिती देत विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व फायदे सांगितले. वाचन कट्टा हा उपक्रम ग्रंथालयामार्फत सुरू करण्यात आला. यास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा असे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमासाठी समिती प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, ग्रंथपाल प्रा.संतोष देशमुख, डॉ. शिवाजी हुसे, डॉ.गोविंद बुरसे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. अलका गडकरी, डॉ.विजय मातकर, प्रा. अशोक भोसीकर डॉ. प्रतिभा अहिरे डॉ. प्रकाश खेत्री, डॉ. उदय डोंगरे डॉ.राकेश अहिरराव डॉ. प्रकाश महाजन तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक सर्व शिक्षकेतर कर्मचारी तसेच फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर व सर्व प्राध्यापक तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल संतोष देशमुख, सूत्रसंचालन डॉ. रामचंद्र झाडे, आभार डॉ. राकेश अहिरराव यांनी मानले कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व समिती सदस्य मंडळ तसेच सर्व प्राध्यापक व सर्व शिक्षकेतर कर्मचारी एनसीसी कॅडेट व एनएसएस स्वयंसेवकांनी मेहनत घेतली.

## ओलंपियाड मुचमेंट परिक्षेत दिलीप चव्हाण जिल्हयात प्रथम



**कन्नड (अरुण थोरात):** स्वामी समर्थ बहुउदेशीय संस्था संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड माध्यमिक विद्यालय कन्नड येथील विद्यार्थी दिपक चव्हाण याने कॉमटेक कॉम्प्युटर्स येथे झालेल्या 'MKCL ऑलिम्पियाड मुचमेंट' परीक्षेत संभाजीनगर जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्याच्या या कामगिरी बद्दल महाराजा सयाजीराव गायकवाड माध्यमिक विदयालय व कॉमटेक कॉम्प्युटर च्या वतीने विद्यार्थी दिपक राजेंद्र चव्हाण याचा सत्कार करण्यात आला. विदयालयाच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष जि.एस. गायकवाड, सचिव उदयसिहं गायकवाड यांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यक्रमासाठी श्री जालनापूरकर, पालक राजेंद्र चव्हाण, अनिता चव्हाण मुख्याध्यापक उद्धव पवार, पी एस गायकवाड, राजू सपकाळ, विलास इंगळे, सुनील गायकवाड, दीपक कुमावत, बाळू डगळे, मनोज कुंटे, गणेश कोकणी, तातेराव गोरे, विनोद भुसारे, उज्वला शेळके, अनुपमा मोरे, मेघा जाधव, योगिता निकम, प्रियंका बोरसे, दीपाली सनांसे, मीनाक्षी भामरे, रेखा चव्हाण, सचिन बोडखे आदि उपस्थित होते,

## रविवारी भगवान गडावर रंगणार राज्यस्तरीय कविता महोत्सव

**कन्नड (अरुण थोरात):** श्रीक्षेत्र भगवानगड मेहगाव ता. कन्नड येथे दि. ०५ जानेवारी रोजी ७ वा राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवाचे आयोजन करण्यात आली असून उपक्रमांची तयारी पूर्ण झाल्याची माहिती संयोजक डॉ शिवाजी हूसे, स्वागताध्यक्ष गणेश घुगे यांनी दिली. रविवारी हा साहित्य महोत्सव संपन्न होत असून अध्यक्षस्थानी प्रख्यात कवी लक्ष्मण महाडिक, उदघाटक किशोर बालभारतीचे कार्यकारी संपादक किरण केंद्रे, तर प्रमुख अतिथी म्हणून आ.संजनाताई जाधव, कन्नड चे तहसीलदार विद्याचरण कडवकर, भगवानगड संस्थान चे अध्यक्ष सुधीर घुगे, शिवाजी महाविद्यालय कन्नड चे प्राचार्य डॉ. विजयजी भोसले, साहित्यिक सर्जेराव जीगे, डॉ प्रतिभा अहिरे, डॉ. सिताराम जाधव, सागर जाधव, डॉ. रमेश सुर्यवंशी, डॉ. अंबादास सगट, डॉ रंगनाथ लहाने, वकील संघाचे अध्यक्ष ॲड कृष्णा पाटील जाधव, पुंडलिक काजे, डॉ. दिलीप बिरुटे, अशोक शेवगण, प्राचार्य डॉ युवराज धबडके, डॉ. मोहन सौंदर्य, डॉ. सुधाकर जाधव, डॉ. संजय गायकवाड, पी.एम.डहाके, डॉ.नवनाथ गोरे, सरपंच रेखा बोंगाणे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहेत. कार्यक्रमांची सुरुवात पहिल्या सत्रात सकाळी ९:०० वा. ग्रंथ दिंडी, उदघाटन समारंभ ने होणार आहे. दुसऱ्या सत्रात १२:०० वा. पुरस्कार वितरण सोहळ्यात तिफण राज्यस्तरीय पुरस्कार कवी सुनील डोके, अशोक गायकवाड, लक्ष्मण वाल्डे यांना तर तालुका साहित्य सन्मान मा.आ. तेजस्विनी जाधव यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येईल, तिसऱ्या सत्रात दुपारी २:०० पासून प्रा. संध्या महाजन यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ.गजानन सानप, सत्यशीला तौर, ज्योती सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत निमंत्रित कवींच्या कवीसंमेलनास तर डॉ. रामचंद्र झाडे यांच्या अध्यक्षतेत स्थानिक कवींचे कवी संमेलन संपन्न होईल, दरम्यान प्रसिद्ध चित्रकार महादू गावित, इम्रान शेख यांचे चित्रप्रदर्शनाचा आस्वाद घेता येईल, कवी पांडुरंग गिराम यांच्या 'आजोळ' तर कवयित्री छाया वाघ-जायभाये यांच्या 'घूसमट' या कविता संग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होईल.या कार्यक्रमात जास्तीत जास्त काव्यरसिक, साहित्यप्रेमी नी सहभागी होण्याचे अवाहन संयोजक डॉ शिवाजी हुसे, स्वागताध्यक्ष गणेश घुगे, भगवानगड ट्रस्टचे अध्यक्ष सुधीर घुगे, शाखाध्यक्ष प्रविण दाभाडे, सचिव अरुण थोरात, भिमराव सोनवणे, ज्ञानेश्वर गायके, संदीप वाकडे, सुरेश औटे, लक्ष्मण वाल्डे, दत्ता मोरसकर, श्रीराम दापके, ब्रम्हगिरी गोस्वामी, का का थोरात, अनिता राठोड, शुभदा देवरे, गितांजली गजबे, अपर्णा धाटबळे, शिवनाथ गायकवाड, केशरचंद राठोड, जनार्धन गोरे, रामेश्वर मोरे, नंदूलाल कुचे आदींनी केले आहे.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ जानेवारी २०२५

# भटकंती रहस्यमय जलयुक्त सुतोंडा किल्ल्याची



मध्ययुगीन ईतिहास कालखंडात अखंड हिंदुस्थानाचे दोन भाग होते उत्तर व दक्षिण हिंदुस्थानदक्षिण हिंदुस्थान नेहमी उत्तर हिंदुस्थानातून होणाऱ्या आक्रमणामुळे त्रस्त होता.या आक्रमकांना रोखण्यासाठी अजिंठा सातमाळा डोंगर रांगेत असंख्य गड किल्यांची निर्मीती करण्यात आली.त्यातील काही काळा च्या ओघात उध्वस्त झाले तर काही आज ही ताठ मानेने उभे आहेत. त्यापैकी एक किल्ला म्हणजे सुतोंडा/सुतोंड्या/नायगाव चा किल्ला/ ता.सोयगाव याचे भौगोलिक स्थान :-

माझ्या कडील जीपीएस लोकेशन नुसारअक्षांश - 20.469819रेखांश - 75.355237समुद्र स.ऊंची - 482 मी. ( 1581 फुट)प्रकार :- गिरीदुर्गस्वरुप :- मध्यमईतिहास:- फारसा ज्ञात नाही परंतु प्रवेशद्वारा वरील हत्ती चा वध करणारा सिंह असलेले शरब चिन्ह या वरतुन हा किल्ला काही काळ अहमदनगर च्या निजामशाही अधिपत्याखाली असावा असा अंदाज काढता येतो कारण अशाच प्रकारचे शरब चिन्ह वेताळवाडी व जंजाळा किल्ल्यावर आहे.ते किल्ले अ.नगर च्या निजामशाही कडे होती असा उल्लेख पुरातत्व विभागा कडील नोंदीत आहे.

स्थान:- नायगाव ता.सोयगाव जि.संभाजीनगरपर्वत रांग :- सातमाळ /अजिंठाअशा या सुतोंड्या च्या शोधात आम्ही निघालोय सह्याद्री प्रतिष्ठान कन्नड चे दुर्गसेवक दुपारी दोन वाजे च्या सुमारास सुतोंडा किल्ल्या जवळील नायगावात पोहचलो.गाडी वाटे वरील पुरातन हनुमान मंदिरा जवळ उभी केली हनुमंताचे दर्शन घेतल शेजारीच काही पुरातन मुर्त्या दिसल्या नमन करुण पाऊले निघाली .समोर सुतोंडा स्पष्ट दिसत होता किल्ल्याच्या दक्षिणेस रक्ताई नावाचा डोंगर दिसतो खरे तर ही अजिंठा डोंगरमाळ पर्वत रांग आहेवाटेत एका आदिवासी बांधवाची झोपडी लागली अगदी आखिव रेखीव, रस्त्यावर लहान मोठे दगड विखुरलेले आहेत त्यातून आपले पाय वाचवित चालणे म्हणजे कसरत ठिकठिकाणी खडकां वरती आईल पेंटने किल्याकडे जाणाऱ्या मार्गाच्या स्पष्ट खुणा काढलेल्यासुतोंडा किल्ल्यावर जाण्यासाठी तीन पायवाटा आहेत उत्तरे कडील वाट जोगवाई जैन लेणी कडे जाते. मधली वाट किल्ल्याच्या चोर दरवाजा कडे जाते खडतर जढणी चा रस्ता म्हणजे ही चोर दरवाजाची वाट, तिसरी वाट किल्ल्यास दक्षिणे कडून वळसा घालीत रक्ताई डोंगरा कडे जाते ही सर्वात सोपी वाट या वाटेने महिला लहान मुले ही गडा वरती जाऊ शकतात. परंतु हा डोंगर घनदाट काटेरी वनराईने दाटला असल्याने जंगली प्राण्यांचा सामना करावा लागु शकतो त्यामुळे समुहाने जाणे सोईस्कर.आम्ही गडाला वळसा घालुन रक्ताई डोंगर वाटेने निघालो.वाटेत विस्तीर्ण ओसाड माळ लागला.हा ओसाड माळ म्हणजेच ईतिहासकालीन हत्ती घोड्यांचा बाजारतळ पुर्वी येथे सुतोंडा नावाचे गाव होते असे सांगतात आता फक्त भग्नावशेष शिल्लक आहेत. हिवाळा असुनही ऊन्हा मुळे अंग घामाघुम झाले होते .घाणेरी हेंकाळणी सराटे आणि काटेरी झुडपांतून वाट काढत अर्ध्या वाटेवर पोहचलो.उत्तरेस सुतोंडा तर दक्षिणेकडे रक्ताई नावाचा डोंगर आहे .याच डोंगराचा वायव्येस आलेला एक भाग म्हणजे सुतोंडा किल्ला होय .मानवनिर्मित भली मोठी खिंड पाडून किल्ला विभक्त करण्यात आलाय.

खिंडीच्या दिडशे फुट पुढे आलो आणि एक पन्नास फुटाची निसरटती कपार चढून मुख्य प्रवेशद्वार कडे निघालो.वरती आल्या वर किल्ल्या कडे जाणारी पुरातन वाट लागली ही वाट जोगवाई लेणी मार्गे येत असावी.आमची सर्व टीम मुख्य प्रवेशद्वारा समोर येऊ थांबली. हे प्रवेशद्वार खिंडीतील एका अखंड खडकात कोरुण तयार केले गेले आहे हे छोटे द्वार असल्याने कौशल्याने बनविल्या गेले आहेत. दरवाजा चा वरचा भाग अलीकडे दगड रचुन बनविला गेला आहे. त्या वरती एक शरब(राजचिन्ह) आहेव त्याच्या बाजुस शत्रु वरती हल्ला करण्यासाठी एक झरोका आहे.प्रवेश द्वारातून आता प्रवेश केला की वाट एकदम उत्तर बाजूला वळते व पुढे पश्चिमेकडे वळते साधारण पन्नास फुटाचा हा मार्ग म्हणजे एक बोगदाच पुढे विना छताचा रस्ता दोनशे फुट बांधीव असा आहे बाजुने भींती उभारल्या होत्या आता त्या उध्वस्त होत चालल्याय.रस्ता पार केला की समोर भल्या मोठी पाण्याची दोन टाके लागतात या पाणी असुन पाणवनस्पती व शेवाळां मुळे त हिरवे झाले आहेत.टाके ओलांडून दक्षिण बाजुने चालु लागले की दगडी भींतींचे पडझड झालेले छोटे दरवाजे लागतात. ते पार करुण पुढें चालत राहिले की पुन्हा दोन पाण्याची टाके लागतात विशेष म्हणजे या किल्या वरील मोठी टाके अखंड खडकांत कोरली असून चौकोनी खांबांचा आधार देण्यात आलाय आणि हे अखंड आहेत. जाणकारांच्या मते या टाक्यांच्या आता भींतीस शिल्पे कोरली आहेत. या टाक्यांत वर्षभर पाणी राहत असल्याने शिल्पे दिसणे अवघड असतेयातील एका टाक्यात आम्हाला नितळशार पाणी आणि त्यात माशां च्या झुंडी विहरतांना दिसल्या म्हणजे हे पाणी पिण्यास योग्य यथेच्छ पाणी पिऊण आम्ही त्रुप्त झालो. येथुन पुढे किल्ला बघण्या सारखा आहे जिकडे तिकडे पाण्यानी डबडब भरलेली टाकेच टाकेया टाक्यांची विभागी तीन टप्प्यात करण्यात आलीय वरती मोठी त्या खाली मध्यम व छोटी टाके वरची विशाल टाकी हत्ती घोड्यांना पाणी पिण्यासाठी तर खालची टाकी वापरा व पिण्यासाठी विशेष म्हणजे पाणी तीन टप्प्यात गाळुन शेवटी छोटया टाक्यात येते ही अदभुत आणि रहस्यमय रचना आहे. ही सबंध टाकी किल्लया ची दक्षिण व पश्चिम बाजुस आहेत.टाक्यांच्या साखळी बाजुस पीरांची दोन थडगी बांधली आहेत. थडग्यांच्या लगत पुरातन कमानी दरवाजा आहे.सध्या तो कोसळण्या च्या मार्गावर आहे. येथून खाली तीन चार टाके आहेत व नैऋत्य दिशेने खाली चोर दरवाजा आहे हा छोटेखानी दरवाजा असुन एका वेळी एकच व्यक्ती जाऊ शकेल अशी रचना करण्यात आली आहे. या दरवाजा पासुन गडा खाली जाणारी निसरटती पायवाट आहे.या किल्ल्यावर लहान मोठी बावन्न पाण्याची टाके आहेत.किल्ल्या च्या माथ्यावर भग्न वाड्याचे अवशेष आहेत हाच तो बालेकिल्ला या शिवाय कोठे ही मानवी वसाहतीचे अवशेष नजरेस पडले नाही.बालेकिल्ला बघुन पुर्व बाजुने खाली विशालकाय पाण्याचे टाके आहे हे पाण्याचे टाके तर काही अर्धवट कोरलेले टाके आहे की लेणी हा संशोधनाचा विषय आहे. अशी त्याची रचना आहे.या टाक्यांच्या खालच्या बाजुस जोगवाई चे व जैन शिल्प असलेले लेणी आहे. हे ठिकाण पाहिले की आपली सुतोंडादुर्ग भटकंती संपतेआम्ही उत्तर बाजुने काट्या कुपाट्यांतू वाट काढ नैऋत्य दिशे कडील चोरवाट दरवाजा मार्गे गड उतरु लागलो आणि सुतोंडा डोळ्यात साठवून परती च्या प्रवासाला लागलो. नायगाव येथे पुरातन रेखीव बारव आहे परंतु वेळे अभावी ते बघू शकलो नाही.सुतोंडा खरोखर एक रहस्यमय मध्म उंचीचा किल्ला असुन जलव्यवस्थापन चा एक उत्कृष्ट नमुना आहे विषेश म्हणजे या किल्ल्या वरतून किल्ले अंतूर हा किल्ला दिसतो .किल्ले अंतूर हून लोंझागड दिसतो. लोंझगडाहून कन्हेरगड तर कन्हेरगडा वरुण पेडका किल्ला दिसतो.पेडक्या वरुण थापलागड दिसतो.थोड्या काय तर संकट काळी एका किल्ल्या वरुण दिले ईशारा शेवट च्या म्हणजे वेताळवाडी किल्ला पर्यंत सहज पोहचू शकतो तर तिकडे थापलागडा वरुण सुवर्णपालेश्वर गड व तेथुन महेशमाळ पर्वत व तेथून देवगिरी किल्ला सहज दिसतो. अशी या अजिंठा डोंगर रांगेतील मानव निर्मित किल्याची रचना. असे म्हणतात की धोक्या चा ईशार किंवा ईतर संदेश पाठविण्या साठी या किल्ल्यावर उंच रंगीत निशाण फडकविल्या जाई किंवा आग पेटवून धुरांचे लोळ दुसर्या किल्ल्यावर सहज बघितल्या जाई अशी या माळे ची निर्मिती .सुतोंडा किल्याची बांधनी केवळ पाणी पुरवठा साठीच केली की काय हा प्रश्न येथे निर्माण होतो. या किल्ल्यावरुण आसपास च्या परिसरात पाणी पुरवठा केल्या जात होता. त्या साठी भुमी अंतर्गत जलवाहिन्या बांधण्यात आल्या होत्या त्यातील एका जलवाहिनी तून चार किमी अंतरा वरील बनोटी गावातील मंदीरात पाणी नव्वद च्या दशका पर्यंत वाहत होते असे स्थानिक लोक सांगतातनायगाव येथे सुतोंडा वाटेत एक नंदी ची भग्न मुर्ती आहे असे सांगतात परंतु ती आमच्या नजरेत आली नाही. पुढच्या वेळी उरलेल्या वास्तुशिल्पांचा शोध घेऊसुतोंडा किल्ला सोयगाव या तालुक्या च्या गावा पासून वीस पंचवीस तर कन्नड शहरा पासुन पन्नास ते साठ किलोमीटर अंतरा वरती आहे खासगी वाहनाची व्यवस्था असेल तर एकाच दिवसात सुतोंडा, लोझांगड हे किल्ले सहज पाहता येऊ शकतात. तसेच सुतोंडा किल्ल्या पासुन ऐंशी किलोमीटर अंतर क्षेत्रात कन्हेरगड(पाटणादेवी) ता.चाळीसगाव, पेडका किल्ला, किल्ले अंतुर ,लोंझागड ता.कन्नड, वेताळवाडी चा किल्ला, जंजाळा किल्ला ता.सोयगाव हे किल्ले ही आहेत.

- **अरुण थोरात कळंकीकर**
(सह्याद्री प्रतिष्ठान कन्नड विभाग) ९३७३७८७३७०